ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख १७ ऑगस्ट, १९६० अंक ३२

pratibha-60. 3

## आयुर्विम्यामुळें जीवन अधिक सुखमय होतें....





आयुर्विमा उतरविल्या दिवसापासून आपल्या मुलांच्या शिक्षणाची, मुलीच्या विवाहाची, कुटुंबाची अथवा उतार वयांत लागणाऱ्या पैशाची काळजी दूर होते. त्यामुळें जीवनांत निश्चितता येते व ते अधिक सुखमय होते.

आयुर्विमा कार्पोरेशन दरवर्षी हक्कपूर्तीचें रूपानें जे २८ कोटी रुपये देते, त्यांतील २१ कोटी रुपयाहून अधिक रक्कम विमेदारांना त्यांच्या हयातीतच मिळते. या हक्कपूर्तीच्या रकमेतून आणखी कितीतरी अपुऱ्या इच्छा पुऱ्या करतां येणें शक्य होईल म्हणून शक्य तेवढ्या लवकर विमा उतरविणें तुमच्या हिताचे आहे. ओळखीचा विमा अेजंट विविध योजना समजावून सांगेल.

**आयुर्विम्याला दुसरा पर्याय नाहीं**

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

# विविध माहिती

**क्षयरोगाविरुद्ध मोहीम**—गुजरात सरकारनें क्षयरोगाचा प्रसार थांबविण्याची एक योजना तयार केली आहे. ह्या योजनेला ३५ लाख रुपये खर्च येणार आहे. त्यापैकीं २५ लाख रुपये क्षयरोगाचा प्रादुर्भाव होऊं नये म्हणून योजावयाच्या उपायांवर खर्च होणार आहेत. बाकीचे १० लाख रुपये क्षयरोगावरील औषधासाठीं खर्च होतील.

**आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सव**—लोकसभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री डॉ. केसकर ह्यांनीं असें सांगितलें कीं १९६१ च्या ऑक्टोबर महिन्यांत भारतांत आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सव भरविण्याच्या प्रश्नाचा सरकार विचार करीत आहे. महोत्सव साजरा झाल्यास तो भारतामधील पहिलाच ठरेल.

**औद्योगिक संस्थेची स्थापना**—मध्यप्रदेश सरकारनें कटनी येथें एक औद्योगिक संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ही संस्था सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणार असून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत छोट्या उद्योगधंद्यांची स्थापना करण्याच्या कामीं मदत देण्याचें काम ती करील. संस्थेसाठीं १ लाख रुपयांचें भांडवल लागेल. मध्यवर्ती सरकारकडून २·५ लाख रुपयांची मदत मिळणार आहे.

**मदुरा येथील विमानतळ**—मदुरा येथील विमानतळावर अधिक सोयी करण्याची योजना आखण्यांत आली आहे. उतारूंना विश्रांति घेण्यासाठीं एक सोयीस्कर दालन बांधण्यांत येणार असून विमान-अधिकाऱ्यांची राहण्याची सोयहि करण्यांत येणार आहे. सर्व योजनेसाठीं २ लाख रुपये खर्च येईल. बांधकास ऑक्टोबरमध्यें प्रारंभ होईल.

**कलावंतांना मदत**—दरिद्री कलावंत व साहित्यिक ह्यांना आर्थिक मदत देण्याचें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे. मात्र त्यांनीं आपआपल्या क्षेत्रांत कीर्ति मिळविलेली असली पाहिजे. संकल्पित मदतीची योजना मध्यवर्ती सरकारच्या सल्ल्यानें तयार करण्यांत येत आहे. योजनेचा दोनतृतिअंश खर्च भारत सरकार सोसणार आहे.

**ग्रामीण कॉलेजांना सल्ला**—मद्रास विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलिआर ह्यांनीं ग्रामीण भागांतील कॉलेजांनीं पदवीनंतरचे अभ्यासक्रम ठेवण्याच्या मार्गे लागूं नये, असा सल्ला दिला आहे. त्यापेक्षा भूगर्भशास्त्र, खनिजशास्त्र, अणुशास्त्र, इत्यादि उपयुक्त पण दुर्लक्षित विषयांचे अभ्यासक्रम ठेवावेत असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**कच्चा फिल्मचा कारखाना**—कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना उटकमंड येथें एका फ्रेंच कंपनीच्या साह्यानें काढण्यांत येणार आहे. संकल्पित कारखान्यांत तयार होणाऱ्या फिल्मचा दर्जा कसा राहील ह्याविषयीं सध्यां संशोधन करण्यांत येत आहे. संशोधन-शाळेंतील प्रयोग पूर्ण झाल्यावर कारखान्याच्या प्राथमिक कामास प्रारंभ होईल.

**सूर्याच्या उष्णतेचा उपयोग**—सूर्याच्या उष्णतेचा जळणासाठीं उपयोग करता येईल काय हें पहाण्यासाठीं लेह येथें हिंदी शास्त्रज्ञ कांहीं प्रयोग करणार आहेत. तेथील एका मठांत शास्त्रज्ञ आपली प्रयोगशाळा स्थापन करणार आहेत. त्याशिवाय पवनचक्क्यांच्या साह्यानें वीज उत्पन्न करतां येईल काय, हेंहि अजमावण्यांत येणार आहे.

**केरळ सरकारचा कार्यक्रम**—केरळ राज्य सरकारनें आपल्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा आराखडा तयार केला आहे. कार्यक्रमांतील विविध योजनांवर ३०७·६६ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. ह्या रकमेपैकी अवघे ५०·६ कोटी रुपये राज्य सरकार स्वतःच्या बळावर उभारणार आहे.

**नेपाळसाठीं कालवा**—कोसी नदी योजनेचा एक भाग म्हणून भारत सरकार नेपाळच्या प्रदेशांत ४० मैल लांबीचा कालवा काढणार आहे. नेपाळसाठीं सदिच्छा दाखविण्यासाठीं तो काढण्यांत येत आहे. कालव्याचें काम लवकरच सुरू होणार आहे. तो पूर्ण करण्यास सुमारें ३·२३ कोटी रुपये लागतील.

**हिंवतापविरोधी मोहीम**—अविभक्त मुंबई राज्य असतांना चालू करण्यांत आलेली हिंवतापविरोधी मोहीम गुजरात राज्य-सरकार अधिक नेटानें चालविणार आहे. पुढील वर्षी औषधांचे फवारे मारण्याचें काम बंद ठेवण्यांत येणार असून ग्रामीण भागांतील प्रत्येक घराघराची हिंवतापाबाबत तपासणी करण्यांत येणार आहे. मोहिमेचें हें दुसरें वर्ष आहे.

**पोलादाचा चवथा कारखाना**— भारताचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं लोकसभेंत असें सांगितलें कीं बोकॅरो येथें काढण्यांत यावयाचा पोलादाचा कारखाना खाजगी मालकीच्या विभागांत उभारला जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. खाजगी मालकीचा एखादा कारखाना निघणार असल्यास तो बोकॅरो येथील कारखान्याव्यतिरिक्त असेल.

**जबलपूरमध्यें रिक्षा** – जबलपूर शहरांत सध्यां माणसाकडून ओढल्या जाणाऱ्या अगर सायकलस्वाराकडून ओढल्या जाणाऱ्या रिक्षा आहेत. त्यांच्या जागीं यंत्रचलित रिक्षा चालू करण्याचा जबलपूरचें कॉर्पोरेशन विचार करीत आहे. ऑटोरिक्षा घेण्यासाठीं म्युनिसिपल कॉर्पोरेशनला कर्ज देण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे.

**रशियांत भारतीय वकील**—रशिआच्या प्रदेशावर उड्डाण करणाऱ्या पॉवर्स ह्या अमेरिकन वैमानिकाची लष्करी चौकशी लवकरच सुरू होणार आहे. त्याच्या चौकशीच्या वेळीं न्यायालयांत हजर राहण्यासाठीं रशिआनें पश्चिम बंगाल विधिमंडळाचे सभासद बॅ. एस्. के. आचार्य ह्यांना आमंत्रण धाडलें आहे. बॅरिस्टर आचार्य ह्यांनीं आमंत्रण स्वीकारलें आहे.

**संपामुळें रेल्वेचें नुकसान**—गेल्या महिन्यांत मध्यवर्ती सरकारच्या कांहीं नोकरांनीं संप केला होता. रेल्वेच्या कामगारांनीं केलेल्या संपामुळें रेल्वेचें ३·७ कोटी रुपयांचें नुकसान झालें. रेल्वेच्या उत्पन्नांत झालेली घट, कारखान्याच्या उत्पादनांतील घट, हंगामी नोकरांचा पगार, इत्यादि बाबींमुळें ही नुकसानी झाली.

**चिनी मातीच्या भांड्यांचे कारखाने**— सौराष्ट्रामधील चिनी मातीचीं भांडीं तयार करणाऱ्या बऱ्याच कारखान्यांना कोळशाची टंचाई भासत आहे. टंचाईमुळें निरनिराळ्या कारखान्यांतील २,००० मजुरांवर बेकारीचें संकट कोसळण्याची शक्यता आहे. कोळशाची वहातूक करण्यास पुरेशा वाघिणी मिळत नसल्यानें ही परिस्थिति उद्भवली आहे.

**गुजरात स्टेट ट्रॅन्सपोर्ट**—गुजरात स्टेट ट्रॅन्सपोर्ट खात्यानें २४० नव्या बसगाड्या घेण्याचें ठरविलें आहे. ह्या गाड्यांसाठीं १·२५ कोटी रुपये द्यावे लागतील. नवीन गाड्या येत्या नोव्हेंबरमध्यें येतील. ह्या गाड्या आल्यावर गुजरात स्टेट ट्रॅन्सपोर्ट संघटनेंतील गाड्यांची संख्या २,००० होईल.

# अर्थ

बुधवार, ता. १७ ऑगस्ट, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसरी पंचवार्षिक योजना व तांत्रिक शिक्षण

म्हैसूर राज्यांतील कर्नाटक रिजनल एंजिनिअरिंग कॉलेजचें उद्‌घाटन केंद्रीयमंत्री प्रा. हुमायून कबीर ह्यांच्या हस्तें करण्यांत आलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस देशांतील एंजिनिअरिंग कॉलेजांमधून २०,००० विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय करण्यांत येईल. शिवाय औद्योगिक शाळांतून ४०,००० विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय करण्यांत येईल. सध्यां सर्वच जग एका प्रकारच्या शास्त्रीय क्रांतींतून जात आहे. सर्वच राष्ट्रांची एकमेकांशीं स्पर्धा लागलेली आहे. भारतानेंहि ह्या शर्यतींत आपली योग्य ती जागा घेऊन प्रगति केली पाहिजे. शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाच्या बाबतींत भारतानें झपाट्यानें पुढें गेलें पाहिजे. आर्थिक विकास साधण्यासाठीच केवळ अशा शिक्षणाची गरज आहे असें नाहीं. लोकांच्या मनांतील भ्रम नाहींसा करण्यासाठीहि त्याची गरज आहे. शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाच्या बाबतींत म्हैसूर सरकारनें मारलेली आघाडी कौतुक करण्यासारखी आहे. पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या बाबतींत जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें त्याच्याहि पुढें म्हैसूरचें सरकार गेलें आहे. भारतामधील सर्व राज्यांत ह्या बाबतींत म्हैसूरच पुढें आहे. म्हैसूर राज्यांतील एंजिनिअरिंग कॉलेजांत १,३०० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आलेली आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. म्हैसूर राज्याचे शिक्षणमंत्री ह्या प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं शास्त्रांच्या व्यावहारिक उपयोगाकडे शिक्षण देतांना अधिक लक्ष देण्यांत आलें पाहिजे. त्याचप्रमाणें गणित व शास्त्रें ह्यांचें शिक्षण प्रथमपासूनच अधिक कसदार करण्यांत आलें पाहिजे.

## रशिअन तेलाची आयात तहकूब

भारत सरकार रशिआकडून अशुद्ध तेलाची आयात करण्याचा विचार करीत होतें. परंतु ही आयात तूर्त तरी करण्यांत येणार नाहीं, असें खाणी व तेल मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं लोकसभेंत जाहीर केलें आहे. ह्यासंबंधींच्या प्रश्नांना उत्तरें देतांना ते म्हणाले कीं, बर्माशेल आणि स्टॅनव्हॅक ह्या कंपन्यांनीं तेलाच्या किंमतींत कपात करण्याची तयारी दाखविली होतीच. आतां काल्टेक्स कंपनीनेंहि अशी तयारी दाखविली आहे. ह्या कंपन्या अशुद्ध तेलाची आयात करून आपल्याच कारखान्यांत त्यांचें शुद्धीकरण करीत असतात. त्यांनीं अशुद्ध तेलाच्या किंमतींत ११ टक्क्यांपेक्षा थोडी अधिक कपात केली आहे. तेलापासून बनविण्यांत येणाऱ्या इतर पदार्थांवर ह्या कपातीचा काय परिणाम होईल तें आतांच निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें अशुद्ध तेलासाठी द्यावयास लागणाऱ्या परदेशीय चलनांत किती बचत होईल हेंहि आजच सांगतां येण्यासारखें नाहीं. रशिआनें भारताला अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्याची तयारी दाखविली होती. त्याबाबत रशिआशीं वाटाघाटीहि चालू होत्या. पण नंतर असें आढळून आलें कीं रशिआकडून आलेलें तेल शुद्ध करण्यास कारखाना नव्हता. दुसरें असें कीं, सध्यां तेलशुद्धीचे जे कारखाने आहेत त्यांना अधिक तेल शुद्ध करतां येण्यासारखें नाहीं. म्हणून सर्व परिस्थितीचा विचार करून रशिआकडून सध्यां तेल आयात करावयाचें नाहीं असें ठरविण्यांत आलें. भारतामधील तेल कंपन्यांनीं रशिआचें तेल शुद्ध करण्याचें नाकारलें हें खरें आहे. कारण, त्यांना लागणारें अशुद्ध तेल त्या स्वत: स्वतंत्रपणें आयात करूं शकतात.

## राजदूतांच्या मोटारींच्या विक्रीचा बाजार

दिल्ली येथें राजदूतांच्या मोटारींचा एक बाजारच खुला झाल्यासारखें दिसत आहे. गेल्या वर्षी दिल्लीमधील निरनिराळ्या देशांच्या राजदूतांच्या मालकीच्या २०० मोटारगाड्या भरमसाट किंमतींना खुल्या बाजारांत विकण्यांत आल्या. गेल्या एप्रिलमध्यें एका राजदूतानें आपली १९५८ ची शेवरोलेट गाडी ५१ हजार रुपयांना विकली. पश्चिम आशिआंतील एका देशाच्या राजदूतानें आपली १९५७ ची शेवरोलेट गाडी ४५ हजार रुपयांना विकली. नंतर ती घेणाऱ्यानें तिची ६५ हजाराला मुंबईंत विक्री केली. अगदीं अलीकडे दिल्लीमधील एका वरिष्ठ प्रतीच्या राजदूतानें आपली १९६० ची शेवरोलेट गाडी ८० हजार रुपयांना विकली. शेवरोलेट गाडीला आलेल्या किंमतीचा हा बहुधा उच्चांक असावा. ह्या गाडीची आयात पांच महिन्यांपूर्वीं करण्यांत आली होती. दिल्ली येथून आपली बदली झाल्याच्या सबबीवर वरील राजदूतानें गाडी विकण्याची परवानगी भारत सरकारकडे मागितली. परवानगी मिळाल्यावर एका व्यापाऱ्याला गाडी ६५ हजार रुपयांना देण्याचें त्यानें कबूल केलें. पण दुसऱ्या एका व्यापाऱ्यानें ७२ हजार रुपयांना गाडी घेण्याचें कबूल केलें. दरम्यान राजदूताच्या भावामार्फत मुंबईच्या एका मोटार व्यापाऱ्याशीं बोलणीं सुरू करण्यांत आलीं व गाडी ७० हजार रुपयांना विकण्याचें ठरलें. पण, अखेर दिल्ली येथील एका व्यापाऱ्यानें ही गाडी ८० हजार रुपये देऊन खरेदी केली. राजदूतांना गाडी आयात करतांना भारत सरकार व त्यांचे सरकार ह्यांच्याकडून बऱ्याच सवलती मिळतात. त्यांचा गैरफायदा घेऊन ह्या राजदूतानें ६२ रुपयांचा नफा मिळविला.

## एक्सपोर्ट रिस्क्स इन्शुरन्स कॉर्पोरेशन

एक्सपोर्ट रिस्क्स इन्शुरन्स कॉर्पोरेशननें १ जानेवारी ते ३० जून, १९६० या कालावधींत १३५ विमापत्रें दिलीं. १९५९ मधील याच मुदतींत ११० विमापत्रें दिलीं होतीं. या कॉर्पोरेशननें पत अटीवर निर्यात होणाऱ्या मालाची जोखीम स्वीकारण्याच्या आपल्या कामास ऑक्टोबर १९५७ मध्यें प्रारंभ केला व ३० जून, १९६० पर्यंत एकूण २६९ विमापत्रें दिलीं. त्यांची कमाल जोखीम ६.७४ कोटी रुपयांची आहे. ३० जून, १९५९ रोजीं हेच आंकडे अनुक्रमें १९८ विमापत्रें आणि ६.५४ कोटी रुपये असे होते. यंदांच्या पहिल्या सहा महिन्यांत या संस्थेनें ३.५० कोटी रु. ची जोखीम पतकरली. १९५९ मधील याच मुदतींतील हा आंकडा २.३२ कोटी रुपये होता. म्हणजे यंदां त्यांत ५० टक्क्यांनीं वाढ झाली. याच मुदतींत विमाहप्त्यांचें उत्पन्न १,०५,८८५ रुपये मिळालें; १९५९ मध्यें तें ७५,२३८ रुपये मिळालें होतें. म्हणजे यंदां त्यांत ४० टक्क्यांनीं वाढ दिसून आली.

## रिझर्व्ह बँकेचें पलाई बँकेबाबत धोरण

[ पलाई बँक लिक्विडेशनमध्यें न जाऊं देण्याबाबत केरळमधील लोकमताची पार्श्वभूमि लक्षांत घेतली, म्हणजे त्याविषयक तक्रारींचें मूल्यमापन करतां येईल. केरळमधील बँकिंगचा इतिहास आणि परिस्थिति, यांकडे रिझर्व्ह बँकेनें दक्षता बाळगून सतत लक्ष पुरविलें आहे. पंधरा वर्षांपूर्वी बंगालमधील बँकिंग सुस्थितींत आणण्यांत रिझर्व्ह बँकेनें कसें यश मिळविलें होतें; रिझर्व्ह बँकेचा दृष्टिकोन कसा व्यावहारिक आहे; अशक्य गोष्टी शक्य करण्याची तिच्याजवळ किमया कशी नाहीं; हें लक्षांत आणावयास हवे. ]

पलाई सेंट्रल बँकेवर ठेवीदारांनीं गर्दी केल्यामुळें तिला कारभार चालविणें अशक्य आहे, अशा रिझर्व्ह बँकेच्या अर्जावरून केरळ हायकोर्टानें ऑफिशिअल लिक्विडेटरला तात्पुरता लिक्विडेटर नेमला आहे. ह्या बँकेचा १९५९ असेरचा तपशील असा आहे :—

स्थापना : १९२७, वसूल भांडवल २४·८१ लक्ष रु., रिझर्व्ह फंड १५·६० लक्ष रु., ठेवी ९·८१ कोटी रु., कचेर्‍या २५., तोटा १४·४७ लक्ष रु.

त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँक १९३७ मध्यें बंद पडली, त्यानंतरची बँकिंग क्षेत्रांतील ही सर्वांत मोठी दुःखदायक घटना आहे. पलाई बँकेच्या लिक्विडेशनचे दुष्परिणाम केरळांतील इतर बँकांवर होऊं नयेत, ह्यासाठी रिझर्व्ह बँकेने डेप्युटी गव्हर्नर श्री. एम. व्ही. रंगाचारी ह्यांना त्रिवेंद्रमला पाठविले आहे. "पलाई बँकेची परिस्थिति अशी झाली होती, कीं दुसरा मार्गच उरला नाहीं. रिझर्व्ह बँकेनें तिला आणखी मदत केली असती, तरी ती तिला तारायला निरुपयोगी ठरली असती. पलाई बँकेचीं बरींच कर्जें शहाजोग नाहींत, हें १९५१ मध्येंच दृष्टोत्पत्तीस आलें होतें. १९५६ व १९५८ मधील रिझर्व्ह बँकेच्या तपासण्यांतहि तेंच दिसून आलें; बँकेची परिस्थिति जरा विकट झाल्याचेंच आढळलें. तेव्हां कांहीं विशिष्ट सुधारणा करण्याच्या रिझर्व्ह बँकेनें पुनः सूचना केल्या.

ह्यापूर्वीच रिझर्व्ह बँकेनें कडक उपाय का योजले नाहींत, असा प्रश्न विचारला जाणें स्वाभाविक आहे. केरळमधील कित्येक बँकांना दीर्घकाळ लायसेन्स नाकारण्याचा परिणाम त्या राज्यांतील बँकिंगवर प्रतिकूल होत आहे आणि खातेदारांमध्यें अस्वस्थता निर्माण होत आहे, असें केरळ बँकर्स असोसिएशननें १९५७ मध्यें निदर्शनास आणलें, म्हणून लायसेन्स नाकारण्याचे बाबतींत जरा मंद गति राखण्याचें १९५८ मध्यें ठरविण्यांत आलें. १९६० मध्यें पलाई बँकेची तपासणी केली, तेव्हां तिची परिस्थिति जास्तच खराब झाल्याचें स्पष्ट झालें. रिझर्व्ह बँकेचा सल्ला अंमलांत न आणतां पलाई बँकेनें अधिकाधिक कर्जें दिलीं; तीं वसूल होण्याजोगीं नाहींत म्हणून तिला नव्या सूचना करण्यांत आल्या, त्या अंमलांत आणण्यास तिनें प्रारंभ केला. म्हणून रिझर्व्ह बँकेनें थोडा धीर धरला. रिझर्व्ह बँकेनें आपल्या एका अधिकाऱ्याची पलाई बँकेची प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक केली. बँकेच्या बाबतींत कांहीं करतां येण्याजोगें नाहीं, तेव्हां ती जितक्या लवकर लिक्विडेशनमध्यें नेण्यांत येईल तेवढें चांगलें, असा त्या अधिकाऱ्यानें रिझर्व्ह बँकेस आपला अभिप्राय कळविला. बँकेला १९५९ मध्यें १४·४७ लक्ष रु. तोटा झाल्याचें जून १९६० मध्यें प्रसिद्ध होताच, ठेवीदारांनीं बँकेवर गर्दी करण्यास प्रारंभ केला. त्यांनीं १·५० कोटी रु. काढून घेतले. रिझर्व्ह बँकेनें आतां लिक्विडेशनची योजना केली नसती, तर कांहीं ठेवीदार आपल्या ठेवी घेऊन गेले असते आणि बाकीच्यांना घावयास कांहींच उरलें नसतें. म्हणून, रिझर्व्ह बँकेनें केरळ हायकोर्टांत लिक्विडेशनचा अर्ज केला. बँकेच्या भागीदारांना लिक्विडेशनमध्यें कांहींहि मिळण्याचा संभव नाहीं आणि ठेवीदारांचेंहि मोठें नुकसान होईल." असा खुलासा अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत केला.

१९५७ मध्यें पलाई बँकेला लायसेन्स नाकारला असता, तरी आजच्या सारखीच परिस्थिति तेव्हां झाली असती, असें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. रिझर्व्ह बँकेच्या दक्षिण विभागाच्या लोकल बोर्डानें एकमतानें ठराव केला, कीं बँकेला तारता येण्याजोगी तिची परिस्थिति नाहीं, असेंहि ते म्हणाले.

पंडित नेहरूंना पत्रकार परिषदेंत विचारण्यांत आलें, "रिझर्व्ह बँकेवरच हलगर्जीपणाचा आरोप असतांना, तिनें किंवा अर्थखात्यानें पलाई बँकेच्या कारभाराची चौकशी केली, तर त्यावर लोकांनीं विश्वास कसा ठेवावा? १९५१ पासून बँक अडचणींतच आहे. तिची परिस्थिति असमाधानकारक असतांनाच तिला १९५६ मध्यें रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स दिला. रिझर्व्ह बँकेकडे माहितीचे साप्ताहिक तक्ते येत होते; तरी रिझर्व्ह बँक गप्प कशी बसली?" पं. नेहरूंनीं उत्तर दिलें, "ह्या तक्रारीची चौकशी स्वतंत्र होऊं शकेल, पण पलाई बँकेच्या कारभाराच्या चौकशीस त्यानें बाध येत नाहीं. रिझर्व्ह बँकेचा कार्यक्षमतेबाबत लौकिक फार मोठा आहे; रिझर्व्ह बँकेचा अंदाज कदाचित् चुकलाहि असेल, तेवढ्यावरून त्या संस्थेविरुद्ध उठाव करणें श्रेयस्कर होणार नाहीं."

बँकिंग बिलावरील चर्चेच्या वेळीं, पलाई बँकेच्या प्रश्नावर बोलण्याची लोकसभेच्या कांहीं सभासदांनीं संधि घेतली. "रिझर्व्ह बँकेवरील विश्वासामुळेंच हजारों ठेवीदार नुकसानींत आले. बँकेला शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल करणें म्हणजे तिच्या भक्कमपणाची अधिकृत हमी होय, असें लोकांना वाटतें. लक्ष्मी बँक बंद होऊन फार दिवस झाले नाहींत. व्यवस्थापकांच्या हिशेबांतील चलाखीस आळा घालण्यास आजचा कायदा असमर्थ आहे, असा त्याचा अर्थ होतो. बँकिंग कायदा आणखी आवळला पाहिजे. गेल्या १५ वर्षांत रिझर्व्ह बँकेनें पलाई बँकेची तनिदां तपासणी केली पण "२५ लक्ष रु. ची तूट" तिला शोधून काढतां आली नाहीं. व्यवस्थापकांशीं तीव्र मतभेद झाल्यामुळें चीफ अकौंटंटनें राजीनामा दिल्यावरच ही गोष्ट कळूं शकली. रिझर्व्ह बँकेनें अधिक दक्षतेनें कारभार करावा. दक्षिण भारतांत बनावट चलनी नोटा प्रसारांत होत्या, त्याबाबतहि रिझर्व्ह बँकेनें कित्येक महिने कांहीं केलें नाहीं." अशा आशयाचे विचार व्यक्त करण्यांत आले.

### १ सप्टेंबरला चिठ्ठ्या काढण्यांत येणाऱ्या प्राइझ बाँडच्या मालिका

प्राइझ बाँड योजनेंत ठरल्याप्रमाणें १ सप्टेंबर, १९६० रोजीं १०० रु. किंमतीच्या व ५ रुपये किंमतीच्या प्राइझ बाँडच्या पुढील मालिकांपैकी पहिल्या तिमाहींतील नशीबवान प्राइझ बाँडच्या चिठ्ठ्या काढण्यांत येतील :—

१०० रु. किंमतीचे प्राइझ बाँड :—मालिका : ए. बी. सी. डी. ई. एफ. जी. एच. जे. के. एल. एम. क्यू. आणि यू.

५ रु. किंमतीचे प्राइझ बाँड :—मालिका : एए. एबी. एसी. एडी. एई. एएफ. एजी. एएच. एजे. एके. एएल. एएम. एएन. एपी. एक्यू. आणि एआर.


जगन्नाथाचा रथ!
महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाकरितां अविरत यत्न करूं !!!

## जिल्हाधिकारी श्री. स. बा. कुलकर्णी यांचा सत्कार

### पुणें सं. को. बँकेंतील समारंभ

पुणें जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. स. बा. कुलकर्णी, एम्. ए., आय. ए. एस्., येत्या १ तारखेपासून आपली सध्यांची जागा सोडून पुणें महापालिकेचे प्रशासक म्हणून काम पाहूं लागणार आहेत. जिल्हाधिकारी या नात्यानें त्यांनीं केलेल्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल त्यांचा गौरव आणि महानगरपालिकेचे नवे प्रशासक म्हणून त्यांचें स्वागत असा दुहेरी महत्त्वाचा सत्कार-समारंभ दि. ९ रोजीं सायंकाळीं पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेनें आपल्या सभागृहांत घडवून आणला. या समारंभास बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक आणि वरिष्ठ अधिकारीवर्ग तसेंच पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष आणि अधिकारी उपस्थित होते. बँकेचे अध्यक्ष आमदार श्री. शिवाजीराव काळे आणि पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष श्री. मुगुटराव काकडे तसेंच पुणें महापालिकेचे महापौर श्री. वा. ब. गोगटे यांची श्री. कुलकर्णी यांच्या कामगिरीचा गौरव करणारीं भाषणें झालीं. उत्तर देतांना जिल्हाधिकारी श्री. स. बा. कुलकर्णी म्हणाले, "मी माझ्यावर सोंपविलेलें काम नेहमीं कर्तव्यबुद्धीनें पार पाडण्याचा प्रयत्न करीत असतों व यापुढेंहि करीत राहीन. सरकारी अधिकाऱ्यांनीं केवळ नियमांवर बोट ठेवून आपले अधिकार वापरूं नयेत. नेहमीं सर्वांना समान न्याय मिळेल, पक्षपात होणार नाहीं, याकडेहि लक्ष ठेवलें पाहिजे. तरच राज्य-कारभार देशाच्या व जनतेच्या हिताचा होईल."

---

### मध्यप्रदेशांत सहकारी औद्योगिक वसाहती

मध्यप्रदेश सरकारनें आपल्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सहकारी औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची योजना आंखली आहे. ह्या औद्योगिक वसाहती राज्यांतील महत्त्वाच्या व मोठ्या शहराच्या जवळ उभारण्यांत येणार असून त्यांच्यासाठी १७ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तथापि ह्या वसाहतींतून नवे उद्योगधंदे काढण्यास खाजगी भांडवलालाहि वाव ठेवण्यांत येणार आहे. ज्या कारखानदाराला अगर सहकारी संस्थेला नवा धंदा काढावयाचा असेल त्यानें अगर त्या सहकारी संस्थेनें धंद्यासाठी लागणारें प्राथमिक भांडवल स्वतःच जमवून गुंतवावयाचें आहे. बाकीच्या भांडवलाची व्यवस्था सहकारी बँकांकडून कर्जे मिळवून अगर रिझर्व्ह बँकेकडून कर्जे मिळवून करण्यांत येणार आहे. ह्या कर्जासाठी राज्य सरकार हमी घेणार आहे. औद्योगिक वसाहतींत निघणाऱ्या उद्योगधंद्यासाठी रस्ते, पाणी व औद्योगिक शक्तीची सोय करावी लागेल. वसाहतींच्या प्राथमिक विकासाचीं हीं कामें करण्याची जबाबदारी राज्यसरकार घेणार आहे. पहिली सहकारी औद्योगिक वसाहत बहुधा उज्जैन येथें स्थापन करण्यांत येईल. राज्यांत छोट्या धंद्यांची वाढ करण्याच्या हेतूनें ही सहकारी औद्योगिक वसाहतींची योजना तयार करण्यांत आली आहे. नवीन छोटे उद्योगधंदे काढण्यास तीमुळें उत्तेजन मिळेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. मध्यप्रदेशांत संकल्पित सहकारी औद्योगिक वसाहतींशिवाय आणखी तीन निराळ्या औद्योगिक वसाहती स्थापन करण्यांत आलेल्या आहेत; व पांच औद्योगिक वसाहती उभारणीच्या निरनिराळ्या अवस्थांत आहेत.

---

### प्राइझ बाँड्सची लोकप्रियता

जून, १९६० अखेर ९,२२,०३,९५० रु. च्या प्राइझ बाँड्सची विक्री झाली आहे.

### बनावट पासपोर्टानें २०,००० हिंदी ग्रेटब्रिटनला गेले

बनावट पासपोर्टच्या साह्यानें ग्रेटब्रिटनला गेलेल्यांची संख्या २०,००० भरेल, असा तेथील आपल्या हाय कमिशनरचा अंदाज आहे. त्या सर्वांच्या गुन्ह्यास माफी द्यावी आणि त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना कायदेशीर पासपोर्ट द्यावे, ह्याविषयीं भारत सरकार विचार करीत आहे.

---

### वृत्तपत्रांच्या संख्येंत व खपांत वाढ

गेल्या दोन वर्षांत वृत्तपत्रांची संख्या २९%नें वाढली आहे. १९५७ मध्यें ५,९३२ तर १९५८ मध्यें ६,९१८ व १९५९ मध्यें ७,६५१ वृत्तपत्रें होतीं. दैनिकांचा खप १३·७% नें वाढला.

---

### कोट्याधीशाचें अपहरण

जोहोर येथील आपल्या खराच्या मळ्यावर गेलेल्या सिंगापूर येथील कोट्याधीश व्यापाऱ्याला पळवून नेण्यांत आलें आहे. चालू वर्षी अपहरण करण्यांत आलेला हा आठवा कोट्याधीश आहे.

---

### विनोबाजींचा इंदूर येथील आश्रम

मध्यप्रदेश सरकारनें आचार्य विनोबांना इंदूर येथें आश्रम स्थापन करण्यासाठी आणि अ. भा. सर्वोदय कार्यकर्त्यांच्या शिक्षणाचें केंद्र स्थापण्यासाठी सहा एकर जागा व त्यावरील इमारत विनामूल्य देऊं केली, तिचा विनोबाजींनीं स्वीकार केला आहे.

---

### सर्व बाद; शून्य धावा

"पांच दिवस बॅटिंग करून सर्वजण बाद झाले आणि शून्य धावा निघाल्या" असें मध्यवर्ती सरकारच्या नोकरांच्या संपाचें विजयानगरमच्या महाराज कुमारांनीं लोकसभेंत वर्णन केलें. महाराज कुमार हे क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडियाचे एक माजी अध्यक्ष असून आंध्रमधून निवडून आलेले काँग्रेस पक्षाचे सभासद आहेत.

---

### द. आफ्रिकेचा बँकरेट का वाढला!

दक्षिण आफ्रिकेच्या रिझर्व्ह बँकेनें बँकरेट ४% चा ४½% केला आहे. मार्चमधील बंडाळीनंतर परदेशीय भांडवल बुजलें आहे आणि द. आफ्रिकेंतूनच भांडवल निर्गत होत आहे. त्याचा बँकरेट वाढ हा परिणाम आहे.

---

**भारत-इराण हवाई करार**—भारत व इराण ह्यांच्या दरम्यान हवाई वाहतुकीसंबंधी करार करण्यांत आला आहे. कराराला अनुसरून भारतामधील एखाद्या कंपनीला इराणमधील तेहरान अगर अबादन येथील विमानतळाचा उपयोग करतां येईल; उलटपक्षी इराणच्या कंपनीला दिल्ली अगर मुंबई येथील विमानतळाचा वापर करतां येईल. अधिकृत कंपन्यांचीं नांवें सरकारांकडून जाहीर करण्यांत येतील.

**चामडीच्या रोगाचा उद्भव**—नॉयलानच्या व प्लॅस्टिकच्या वस्तू वापरल्यामुळें एक प्रकारचा चामडीचा रोग होतो, अशी माहिती आरोग्यमंत्री श्री. करमरकर ह्यांनीं लोकसभेंत सांगितली. दिल्ली येथील लेडी आयर्विन इस्पितळांत असा रोग झालेल्या बऱ्याच लोकांवर अलीकडे उपचार करण्यांत आले होते. ह्या वस्तू वापरण्याचें बंद करणें हा एकच उपाय त्यावर आहे.

## आपली खनिज संपत्ति

भारतांत खनिज द्रव्यांचें उत्पादन वाढत आहे. आपल्या देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनांत खनिज द्रव्यांचा मोठा वांटा असून, त्यांचा वाढत्या धातुसंशोधन उद्योगधंद्यासाठी कच्चा माल, विजेची वाढती मागणी पुरी करण्यासाठी लागणारें इंधन म्हणून तसेंच परकीय चलन मिळविणारें एक साधन म्हणून उपयोग होत असतो.

भारतांतील खाणींतून १९५९ मध्यें एकूण १४० कोटी रुपये किंमतीच्या खनिजांचें उत्पादन झालें. या उत्पादनांत वाढ होत असून, या वर्षींच्या पहिल्या तीन महिन्यांतील उत्पादन गेल्या वर्षींच्या पहिल्या तीन महिन्यांतील उत्पादनापेक्षा ९ टक्क्यांनीं जास्त आहे. खाणींत मिळणाऱ्या खनिज द्रव्यांत प्रामुख्यानें कोळसा, अशुद्ध लोखंड, अशुद्ध मँगेनीज, अभ्रक, चुनखडी, बॉक्साइट व इल्मेनाइट यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणें अशुद्ध तांबें, क्रोमाइट, शिसें, जस्त, जिप्सम आणि सोनें यांचेहि सांठे कमजास्त प्रमाणांत आढळतात. भूगर्भशास्त्रज्ञ सतत अशा खनिज द्रव्यांच्या साठ्यांचा शोध करीत असतात.

गतवर्षीं कोळशाचें उत्पादन ४·८ कोटी टन झालें. या वर्षीं तें ५·३ कोटी टनांवर जाण्याची अपेक्षा आहे, तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या उत्पादनांत ९·७ कोटी टनांपर्यंत वाढ करावयाची आहे. गतवर्षीं ८० लाख टन अशुद्ध लोखंडाचें उत्पादन झालें. देशांतील पोलादधंद्याच्या वाढत्या गरजा व निर्यातीसाठीं केलेले करार यांमुळें यंदा या उत्पादनांत बरीच वाढ होईल.

भारताच्या परकीय चलनाच्या उत्पन्नापैकी बरेंच उत्पन्न खनिज द्रव्यांपासून विशेषतः अशुद्ध लोखंड, अशुद्ध मँगेनीज आणि अभ्रक यापासून मिळतें. गतवर्षीं या धातूंच्या निर्यातीपासून ४७ कोटी रुपये उत्पन्न झालें. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आणि त्यानंतरहि भारतांतून होणाऱ्या निर्यातींत अशुद्ध लोखंडाच्या निर्यातीस फार महत्त्वाचें स्थान राहणार आहे. अशुद्ध लोखंडाची निर्यात स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमार्फत होत असते.

सरकारी क्षेत्रांत लोखंडाच्या व इतर खनिज द्रव्यांच्या उत्पादनासाठी नॅशनल कोल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन व नॅशनल मिनरल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन यांसारख्या सरकारी मालकीच्या संघटनांची स्थापना करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें भारत सरकारनें ऑइल अ‍ॅण्ड नॅचरल गॅस कमिशनची स्थापना केली असून हें कमिशन भारतांत खनिज तेलाचा शोध घेण्याच्या कामगिरीवर आहे. गुजरातेंतील खंबायत व अंकलेश्वर या दोन ठिकाणीं व्यापारी प्रमाणावर तेल मिळण्याची चांगलीच शक्यता आहे; परंतु त्यासाठी ड्रिलिंगचें काम मोठ्या प्रमाणावर करावें लागेल.

## आणखी ४ लाख गांसड्या कापसाची अमेरिकेहून आयात

पी. एल्. ४८० कार्यक्रमानुसार भारत सरकार व अमेरिकन सरकार यांमध्यें भारतांत आणखी ४ लाख गांसड्या कापसाची आयात करूं देण्याच्या करारावर दिल्ली येथें स्वाक्षऱ्या झाल्या. या ४ लाख गांसड्यांची एकूण किंमत (वाहतुकीचा ५० टक्के खर्च धरून) १९·८ कोटी रुपये होईल. भारत सरकार या कापसाची किंमत रुपयांत देणार असून त्याच्या विक्रींतून येणाऱ्या उत्पन्नापैकी ८५ टक्के रक्कम भारत सरकारला आपल्या आर्थिक विकासाकरितां वापरतां येईल. त्याचप्रमाणें अमेरिकेंतील इतर व्यापाऱ्यांकडूनहि आणखी २ लाख गांसड्या कापसाच्या आयातीसाठी परवाने देण्याची व्यावस्था करण्यांत आली आहे.

भारतांत १९५६ मध्यें पी. एल्. ४८० हा कार्यक्रम सुरू झाल्यापासून अमेरिकेकडून एकूण ८ कोटी, ७० लक्ष डॉलर किंमतीचा सुमारें ८ लाख गांसड्या कापूस भारतास मिळाला आहे. अमेरिकेनें भारताला आतांपर्यंत एकूण १,६६६ कोटी रुपयांचें आर्थिक साह्य दिलें आहे.

## कंपनी सेक्रेटरी परीक्षांची माहिती देणारी पुस्तिका

कंपनी कायदा शासनयंत्रणेनें कंपनी सेक्रेटरीच्या प्राथमिक आणि इंटरमिडिएट परीक्षांसाठी विद्यार्थ्यांच्या नोंदणीबाबतचे नियम प्रसिद्ध केले आहेत. या दोन्ही परीक्षांचा अभ्यासक्रम, विषय व नियम यासंबंधींची माहिती पुस्तिका नुकतीच प्रकाशित करण्यांत आली असून तीं सरकारी प्रकाशनें मिळणाऱ्या अधिकृत पुस्तकविक्रेत्यांकडे मिळूं शकेल.


# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

९८०, सदाशिव पेठ, लक्ष्मी पथ, पुणें २.

॥ जेथें कर माझे जुळती ॥

**भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत ज्या देशभक्त वीरांनीं देहदंड सोसले, तुरुंगवास पत्करला, स्वेच्छेनें आपलीं जीवितें स्वातंत्र्य मंदिराच्या पायांत सांडून हौतात्म्य पत्करले, त्या सर्व ज्ञात आणि अज्ञात वीरांना नि हुतात्म्यांना स्वातंत्र्य दिनाचे आनंददायक व मंगलप्रसंगीं शतशः प्रणाम !**

★ स्वतंत्र भारत चिरायू होवो ! ★

के. त्र्यं. चांफेकर, B. E., A. M. I. E. मॅनेजर.

शं. ल. लिमये, B. Sc., LL. B., (वकील) अध्यक्ष.

## येत्या शिरगणतींत आर्थिक बाबींवर भर

सन १८७२ च्या फेब्रुवारीपासून भारतांत प्रथम शिरगणतीला प्रारंभ झाला. तेव्हांपासून, प्रत्येक शिरगणतीच्या वेळीं तयार करण्यांत आलेल्या प्रश्नावलीच्या स्वरूपांत सारखा बदल होत गेला आहे. सध्यांच्या शिरगणतींत, आर्थिक बाबींसंबंधीची माहिती मिळविण्यावर अधिक भर आहे; कारण सर्व पातळींवर यापुढें विकास कार्यक्रम हातीं घेण्याच्या दृष्टीनें ही माहिती अत्यावश्यक ठरेल.

प्रारंभीं व्यक्तीच्या व्यवसायासंबंधीं एकच प्रश्न प्रश्नावलींत होता. आतां त्या जागीं निर्वाहाचीं साधनें असे शीर्षक असून तुम्ही शेतकरी आहांत कीं शेतमजूर, तुम्ही घरगुती उद्योगधंद्यांत कामें करतां कीं इतरत्र, तुम्हीं कोठेंच काम करीत नसल्यास, तुमच्या इतर चळवळी काय, असे पांच प्रश्न विचारले जातील.

तसेंच पूर्वीं आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व अवलंबून असलेले अशी वर्गवारी करण्यांत आली होती. त्यामुळें कुटुंबांतील कामें करणाऱ्या बऱ्याच स्त्रियांचा त्यांत समावेश होत नव्हता. कारण, उत्पन्न हेंच मोजमाप होतें. पैसे कमावतां कीं अवलंबून आहात, अशी वर्गवारी होती. सन १९६१ च्या शिरगणतींत कामावर भर आहे. त्यामुळें श्रम करणाऱ्या पण प्रत्यक्ष पैसे न मिळविणाऱ्या स्त्रिया असोत किंवा अत्यंत कमी उत्पन्न मिळविणारीं मुलें असोत, त्यांचा श्रमिक म्हणून उल्लेख होईल.

त्याचप्रमाणें, शिरगणतींत कुटुंबाबद्दलची माहिती मिळविण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या तक्त्याचेंहि स्वरूप अभिनव आहे. या तक्त्यानुसार व्यक्तीबद्दल माहिती मिळविण्यावर भर नसून सबंध कुटुंब म्हणजे एक घटक धरून ते तक्ते तयार करण्यांत आले आहेत. आपल्या देशांत तयार होणाऱ्या सर्वच वस्तू बाजारांत विक्रीस जातात, असें म्हणतां येत नाहीं. कितीतरी वस्तू घरांतच खपतात, तेव्हां व्यक्तीसंबंधींच्या माहितीला अर्थ नसून आर्थिक बाबींचा विचार करतांना सबंध कुटुंबच एक घटक धरून माहिती तयार झाली पाहिजे.

त्याचप्रमाणें, निवासाची स्थिति, घरांतून होणारी दाटी, निरनिराळ्या प्रकारचे वर्कशॉप्स व तेथें काम करणारे लोक व त्यांची स्थिति, इत्यादी संबंधांतहि माहिती गोळा केली जाईल.

तसेंच कांहींहि कामें न करणाऱ्या लोकांची यादी वेगळी केली जाईल; पूर्ण वेळ शिक्षण घेणारे विद्यार्थी, गृहिणी, अवलंबित, सेवानिवृत्त, गुन्हेगार, भिकारी, बेकार किंवा प्रथमच नोकरी शोधणारे अशी यांची वर्गवारी केली जाईल.

अत्यंत परिश्रमानें व आवश्यक ती काळजी घेऊन प्रश्न तयार करण्यांत आले आहेत. केंद्रीय खातीं, नियोजन मंडळ, आंकडेवारी तयार करणाऱ्या व इतर तज्ज्ञ संघटना यांच्या परिषदा बोलावून केंद्रीय; शिरगणतीखात्यानें प्रश्नावलीचा मसुदा दोन वर्षांपूर्वीच प्रथम तयार केला. त्यानंतर राज्यांच्या आंकडेवारी तज्ज्ञांनीं त्याची छाननी केली व अखेरीस सरकारनें त्याला मंजुरी दिली.

प्रश्नावलींतील प्रश्नांचें स्वरूप योग्य आहे किंवा नाहीं आणि त्यांतील आशय लोकांच्या चटकन् ध्यानीं येतो कीं नाहीं याची चांचणी घेण्यासाठी गतवर्षी नमुना शिरगणती घेण्यांत आली होती. यानंतर राज्यांतील शिरगणती खात्याचें काम सुरू झाल्यानंतर, पहिल्या चांचणीनंतर सहा महिन्यांनीं, दुसऱ्यांदा नमुना शिरगणती घेण्यांत आली.

शिरगणतीचें काम संपल्यानंतर उत्तरपत्रिका हातीं येतांच राष्ट्राविषयींच्या आपल्या माहितींत बरीच मोठी भर पडेल. देशांतील प्रत्येक कुटुंबांतील स्त्री-पुरुष व बालकें, देशांतील कारखाने व शेतजमिनी आणि लोकवस्ती असलेल्या इतर जागा यांच्याविषयींची विस्तृत माहिती या शिरगणतीमुळें उपलब्ध होऊं शकेल.

शिरगणतीला एकूण खर्च १·६ कोटी. रु. म्हणजे दरमाणशीं फक्त ३·५ नये पैसे येईल.

---

### मशीन टूल्सचें उत्पादन व आयात

| वर्ष | वार्षिक उत्पादन (लक्ष रु.) | वार्षिक आयात (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १९५० | २६·६० | २४९·०० |
| १९५१ | ४७·३१ | २५०·०० |
| १९५२ | ४४·३७ | २२१·०० |
| १९५३ | ४४·०७ | ३१२·०० |
| १९५४ | ५०·०२ | ३८५·०० |
| १९५५ | ७४·४० | ५२८·०० |
| १९५६ | १२०·२२ | ८३७·०० |
| १९५७ | २५०·८४ | १,४६४·०० |
| १९५८ | ३७६·०० | १,५३१·०० |

भारतांतील मशीन टूल्सचें उत्पादन वाढत असलें, तरी अद्याप गरजेपैकी तीनचतुर्थांश मशीन टूल्सची आयात करावी लागत आहे. १९५८ मध्यें ३·७६ कोटी रु. किंमतीचें उत्पादन झालें, पण १५·३१ कोटी रु. च्या मशीन टूल्सची आयात झाली. हिंदी उत्पादनापैकी ६०% उत्पादन बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या कारखान्यांत होतात. सरकारी मालकीचे आणखी दोन कारखाने आहेत.

---

### पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांचे ठेवीदार व त्यांच्या ठेवी १९५१ ते १९५९

ठेवीदार आणि ठेवी ह्यांत वाढ; पण सरासरी ठेवींत १७ वर्षांत फारसा फरक नाहीं.

| मार्च अखेर | ठेवीदारांची संख्या (हजार) | ठेवलेली रक्कम (लक्ष रु.) | काढलेली रक्कम (लक्ष रु.) | शिल्लक रक्कम (लक्ष रु.) | प्रत्येक ठेवीदाराची सरासरी ठेव (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १९५१ | ४,०९० | ११०,१९ | ९३,८० | १८५,०६ | ४५२·५ |
| १९५२ | ४,४४६ | १२१,३३ | १०८,५५ | १९९,८१ | ४४९·४ |
| १९५३ | ४,८३० | १२४,४९ | १०६,७४ | २१७,६८ | ४५०·७ |
| १९५४ | ५,०७० | १४१,१८ | १२६,९१ | २३१,९५ | ४५७·५ |
| १९५५ | ५,३८४ | १४७,१७ | १२२,६३ | २५६,४९ | ४७६·४ |
| १९५६ | ५,९८८ | १७१,६४ | १३४,६३ | २९३,५० | ४९०·१ |
| १९५७ | ६,३८५ | १९३,९८ | १६५,३२ | ३२२,०८ | ५०४·४ |
| १९५८ | ६,९२० | १९२,१७ | १७४,६२ | ३३९,६३ | ४९०·८ |
| १९५९ | ७,७२४ | २०४,९३ | १८३,७९ | ३६०,७७ | ४६७·१ |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.